( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता )

क्र.पोमसं/८/४६-एफ/लिपिक-ल.ले. पदोन्नती/३४४/२०१३/स्टीई-९८० मुंबई, दिनांक २९/५/२०१७

**वाचा :-**
१. गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/ पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ ब, दि.१६/१२/२०१६.
२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे ज्ञापन दि.१६/१/२०१७.
३. या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.१७/१/२०१७.

**-: आ दे श :-**

शासनाने गृह विभाग निर्णय क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ ब, दि.१६/१२/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण १५ पदे "लघुटंकलेखक" पदावर श्रेणी अवनत करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर श्रेणीअवनतीमुळे पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गात लघुटंकलेखकांची एकूण १५ पदे नव्याने निर्माण झालेली आहेत. सदर १५ पदांपैकी ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. तसेच शासनाने प्रस्तुत शासन निर्णयान्वये, **वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या** कर्मचाऱ्यांना "लघुटंकलेखक" पदासाठी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे अर्हता प्रमाणपत्र धारकांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील खालील नमुद वरिष्ठ श्रेणी लिपिक (अराजपत्रित, गट-क) यांनी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र सादर केल्याने व सदर पदोन्नतीमुळे त्यांच्या मुळ लिपिक संवर्गातील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा हक्क संपुष्टात येणार असल्याबाबतच्या अटी व शर्ती मान्य केल्याबाबत लेखी बंधपत्र सादर केल्याने, त्यांना कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासुन, **लघुटंकलेखक (अराजपत्रित, गट-क)** या पदावर पदोन्नती देण्यात येत असुन, पदोन्नतीवर त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | वरिष्ठ श्रेणी लिपिकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील / नवीन नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | श्री अजित तुळशीदास कदम | आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय (उप सहायक (वि.चौ.) यांचेकडे संलग्न) | रिक्त पदात |
| २. | श्री प्रशांत मधुकर कर्णेकर | अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोकण घटक, बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय (उप सहायक (र. व का.) यांचेकडे संलग्न) | रिक्त पदात |

**डॉ प्रज्ञा सरवदे**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
श्री अजित तुळशीदास कदम, वरिष्ठ श्रेणी लिपिक.
मार्फत :- आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
श्री प्रशांत मधुकर कर्णेकर, वरिष्ठ श्रेणी लिपिक.
मार्फत :- अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोकण घटक, बेलापूर, नवी मुंबई.

२.	"वरिष्ठ श्रेणी लिपिक" व "लघुटंकलेखक" या दोन्ही पदाची वेतनश्रेणी व ग्रेड पे समान असल्याने, "लघुटंकलेखक" पदावर पदोन्नती दिल्यानंतर संबंधितांची म.ना.से. (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११ (१) नुसार विकल्पानुसार वेतननिश्चिती करण्यात येईल, अशी या कार्यालयाची धारणा असल्याचे संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. याबाबत शासनाकडून अद्याप कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी, त्याबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर "लघुटंकलेखक" पदात विकल्पानुसार वेतननिश्चिती करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत माहिती व आवश्यक त्या तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी :-**

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोकण घटक, बेलापूर, नवी मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र.१०, ३२ (२ प्रतीत) व ३६.

२.	उपरोक्त घटक प्रमुखांना विनंती आहे की, त्यांनी संबधित वरिष्ठ श्रेणी लिपिकांना पदोन्नतीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी विनाविलंब कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयास (का.क्र.८ ला लक्षवेध करुन) सादर करावा.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, गृह विभाग, पोल-५ ब, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**( अनुप कुमार सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.